सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - ८५ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. ९ मे २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

# ममता युगाचा अंत! सुवेंदू अधिकारींची मुख्यमंत्रीपदाची शपथ

## ५ दिग्गज मंत्रीही शपथबद्ध

**विदर्भ प्रजास्त्तक**

**दि.९कोलकाता–** पश्चिम बंगालच्या राजकीय इतिहासात एक महत्त्वपूर्ण वळण आले आहे. भारतीय जनता पक्षाने (भाजप) विधानसभा निवडणुकीत दणदणीत विजय मिळवत सत्तेची सूत्रे हाती घेतली आहे. शुक्रवारी सुवेंदू अधिकारी यांनी राज्याचे नवे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. राज्यपाल आर. एन. रवी यांच्या उपस्थितीत लोकभवन येथे आयोजित भव्य समारोहात त्यांच्यासह पाच मंत्र्यांनीही पद व गोपनीयतेची शपथ ग्रहण केली.

या निवडणुकीत भाजपने २९३ पैकी २०७ जागा जिंकून स्पष्ट बहुमत मिळवले आहे. तर ममता बनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेस पक्षाला केवळ ८० जागांवर समाधान मानावे लागले. स्वातंत्र्योत्तर काळात प्रथमच भाजपने पश्चिम बंगालमध्ये सरकार स्थापन केले असून, सुवेंदू अधिकारी हे राज्याचे नववे मुख्यमंत्री बनले आहेत. शपथग्रहण समारोहाला



भव्य स्वरूप प्राप्त झाले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, विविध केंद्रीय मंत्री आणि सुमारे २० राज्यांतील मुख्यमंत्र्यांनी यात उपस्थिती दर्शवली. भाजप कार्यकर्ते आणि समर्थकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. भाजप विधायक दलाच्या बैठकीनंतर शुक्रवारी संध्याकाळी सुवेंदू अधिकारी यांनी राज्यपाल आर. एन. रवी यांची भेट घेऊन सरकार स्थापनेचा दावा केला होता. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत सुवेंदू अधिकारी यांची विधायक दल नेतेपदी एकमताने निवड झाली. त्यानंतर अवघ्या काही तासांतच त्यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली.त्यानंतर दिलीप घोष, अग्निमित्रा पॉल,अशोक कीर्तनिया,निशिथ प्रमाणिक, खुदीराम टुडू या मंत्र्यांनी हि शपथ घेतली. मोदींनी मंचावर रवींद्रनाथ टागोर यांच्या १६५ व्या जयंतीनिमित्त त्यांना आदरांजली वाहिली.त्यानंतर पंतप्रधानांनी मंचावर ९८ वर्षीय भाजप कार्यकर्ते माखनलाल सरकार यांचा सन्मान केला. मंचावर आल्यावर पंतप्रधान थेट सरकार यांच्याकडे गेले, त्यांना शाल पांघरली आणि नंतर त्यांच्या पायांना स्पर्श केला

# अखेर तिढा सुटला; व्हीसीके कडून टीव्हीके ला बिनशर्त पाठिंबा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९चेन्नई–** तमिळनाडूमध्ये नवीन सरकार स्थापन होण्याबाबतचे गूढ आता सुटले आहे. व्हीसीकेने टीव्हीकेला पाठिंबा दिला आहे. यामुळे आता तामिळनाडूमध्ये थलापती विजय यांचे सरकार स्थापन करण्याचा मार्ग मोकळा झाला. याआधी थोल थिरुमावलवन यांच्या पक्षाने, विदुथलाई चिरुथैगल कची (व्हीसीके), अभिनेता विजय यांच्या पक्षाला तामिळगा वेत्री कझगम (टीव्हीके), पाठिंबा देण्यापूर्वी अनेक महत्त्वपूर्ण अटी ठेवल्या होत्या. यामुळे सत्ता स्थापनेत अडचणी येत होत्या. मात्र आता व्हीसीकेने टीव्हीकेला बिनशर्त पाठिंबा



देऊ केला आहे.सूत्रांनुसार, व्हीसीकेने सरकारमधील आपल्या वाट्यामध्ये उपमुख्यमंत्रिपद आणि प्रमुख मंत्रालयांची मागणी केली होती. व्हीसीकेला पक्षप्रमुख थोल थिरुमावलवन यांना उपमुख्यमंत्रिपदी नियुक्त करायचे होते. पक्षाने आपल्या नवनिर्वाचित आमदारांना कॅबिनेट पदे देण्याचीही मागणी केली होती. शुक्रवारी संध्याकाळी व्हर्च्युअली आयोजित पक्षाच्या बैठकीत या मुद्द्यावर चर्चा झाली. जर विजय यांनी तिरुचिरापल्ली पूर्व विधानसभा जागा सोडली, तर व्हीसीके पक्षाची इच्छा आहे की थोल थिरुमावलवन यांनी तेथून निवडणूक लढवावी.असेही मानले जाते की, विजय चेन्नईमधील पेरांबूर जागा कायम राखू शकतात. व्हीसीकेचे प्रवक्ते के. के. पावलन यांनी सांगितले होते की, पक्षाध्यक्ष थिरुमावलवन टीव्हीकेला पाठिंबा द्यायचा की नाही यावर आपला अंतिम निर्णय जाहीर करणार आहे. शुक्रवारी झालेल्या एका उच्चस्तरीय बैठकीत त्यांना अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार देण्यात आला होता.

# आरोप म्हणजे शिक्षा नव्हे!

## निदा खान प्रकरणात असदुद्दीन ओवेसींची एंट्री, विरोधकांना सुनावले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९छत्रपती संभाजीनगर:**

नाशिक येथील टीसीएस कंपनीतील कथित धर्मांतर आणि लैंगिक शोषण प्रकरणातील आरोपी निदा खान हिला छत्रपती संभाजीनगरमधून अटक झाल्यानंतर राजकीय आरोप-प्रत्यारोपांना उधाण आले आहे. एमआयएमचे प्रमुख असदुद्दीन ओवेसी यांनी या प्रकरणात उडी घेत, पक्षावर होणारे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. निदा खानवरील आरोप कोर्टात टिकणार नाहीत आणि काही लोक केवळ मीडिया ट्रायल करत आहेत, असा घनाघाती आरोप ओवेसी यांनी केला.




काल शिंदेसेनेचे नेते संजय शिरसाट यांनी निदा खानला एमआयएमच्या नगरसेवकांनी लपवून ठेवले होते आणि यात माजी खासदार इम्तियाज जलील यांची चौकशी झाली पाहिजे, असा खळबळजनक आरोप केला होता. यावर बोलताना ओवेसी म्हणाले की, निदा खानला आमच्या नगरसेवकाने लपवले हे तुम्हाला कसे समजले? केवळ द्वेषपोटी एमआयएमला टार्गेट केले जात आहे. तुम्हाला जे करायचे आहे ते करा, आमचा न्यायालयावर पूर्ण विश्वास आहे.

ओवेसी यांनी यावेळी बुरख्याच्या मुद्द्यावरूनही सत्ताधाऱ्यांना धारेवर धरले. एखाद्या महिलेने बुरखा घालणे कधीपासून बेकायदेशीर झाले? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. निदा खानची बदली एफआयआर दाखल होण्यापूर्वीच झाली होती, असा दावाही त्यांनी यावेळी केला. आरोप झाले म्हणजे शिक्षा झाली असे होत नाही, असे म्हणत त्यांनी या प्रकरणातील 'मास्टरमाइंड'च्या थिअरीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

# जालन्यात गुणरत्न सदावर्तेंच्या गाडीवर मनसैनिकांकडून शाईफेक

## सुपाऱ्याही फेकल्या; राज ठाकरेंवरील टीकेच्या निषेधार्थ कार्यकर्ते आक्रमक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९जालना–** वकील गुणरत्न सदावर्ते यांच्या गाडीवर जालन्यात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्त्यांकडून शाईफेक करण्यात आली आहे. यावेळी शाईफेकीसोबत सुपाऱ्या देखील फेकण्यात आल्या आहेत. ही घटना शहरातील विशाल कॉर्नर परिसरात घडली आहे. सदावर्ते यांनी काही दिवसांपूर्वी मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्यावर टीका केली होती. याच्या निषेधार्थ मनसैनिकांकडून सदवार्ते यांच्या गाडीवर शाईफेक करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गुणरत्न सदावर्ते हे जालन्यात असताना त्यांची गाडी विशाल कॉर्नर परिसरात आली तेव्हा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या



कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत सदावर्ते यांच्या गाडीवर शाईसह सुपाऱ्या फेकल्या. त्यानंतर तातडीने पोलिसांनी या कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. ताब्यात घेतल्यानंतर देखील कार्यकर्त्यांकडून जोरदार घोषणाबाजी देण्यात येत होती. या घटनेमुळे परिसरात काही काळासाठी तणाव निर्माण झाला होता.

# येत्या शैक्षणिक वर्षात इयत्ता दुसरी, तिसरी, चौथी आणि सहावी या इयत्तांना नवीन पाठ्यपुस्तके लागू होणार

**दि.९पुणे** महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळातर्फे (बालभारती) उपलब्ध करून दिली जाणारी पाठ्यपुस्तकांपैकी काही इयत्तांची पाठ्यपुस्तके शैक्षणिक वर्ष २०२६-२७मध्ये बदलणार आहेत. त्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार इयत्ता दुसरी, तिसरी, चौथी आणि सहावी या इयत्तांना नवीन पाठ्यपुस्तके लागू होणार असून, इयत्ता पाचवी, सातवी, नववी आणि अकरावी या इयत्तांच्या पाठ्यपुस्तकांचे शेवटचे वर्ष असणार आहे.

बालभारतीच्या संचालक अनुराधा ओक यांनी याबाबतची माहिती प्रसिद्धिपत्रकाद्वारे दिली. २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात जून २०२६ मध्ये इयत्ता दुसरी, तिसरी, चौथी, आणि सहावीची पाठ्यपुस्तके नव्याने प्रकाशित होणार आहेत. त्यामुळे पालकांनी नवीन अभ्यासक्रमाची पाठ्यपुस्तके खरेदी करावीत. तर शैक्षणिक वर्ष २०२६-२७ हे इयत्ता पाचवी, सातवी, नववी आणि अकरावी या इयत्तांच्या पाठ्यपुस्तकांचे शेवटचे वर्ष असणार आहे. त्यामुळे या इयत्तांच्या पाठ्यपुस्तकांची खरेदी आवश्यकतेनुसार करावी, अशा सूचना बालभारतीतर्फे संबंधितांना करण्यात आल्या आहेत. इयत्ता दुसरी,



तिसरी,चौथी व सहावीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमासाठी 'शिकू मराठी आनंदे' तसेच हिंदी, उर्दू ,गुजराती, कन्नड, सिंधू, तेलगू, तमिळ आणि बंगाली या इतर माध्यमांसाठी 'करू मैत्री मराठीशी' ही मराठी भाषेची अनिवार्य पुस्तके उपलब्ध करून देण्यात येणार आहेत, असे स्पष्ट करण्यात आले आहे.इयत्ता सहावीसाठी हिंदी सुलभभारती, हिंदी सुगमभारती, तसेच सुगमभारती (कन्नड संयुक्त) तारुफे उर्दू, सिंधू भारती, तेलुगु सरल भारती, गुजराती साहित्य परिचय ही पुनर्मुद्रण (जुन्या अभ्यासक्रमाची) वैकल्पिक पाठ्यपुस्तके उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

इयत्ता पाचवी, सातवी व इयत्ता आठवीच्या एकात्मिक आणि नियमित पाठ्यपुस्तकांमधील आशय मूल्यमापन योजना समान आहे. तसेच ही दोन्ही प्रकारची पाठ्यपुस्तके प्रचलित अभ्यासक्रमावर आधारित आहेत. ही पाठ्यपुस्तके भांडारात शिल्लक असून विक्रीसाठी उपलब्ध आहेत, अशी माहिती ओक यांनी दिली.

इयत्ता नववी ते बारावीसाठी विषय योजना व मूल्यमापन योजनेनुसार विद्यार्थ्यांनी या इयत्तांसाठी बालभारतीने तयार केलेल्या प्रात्यक्षिक नोंदवहीचा वापर करणे बंधनकारक राहील. कोणत्याही शैक्षणिक संस्थेने खाजगी प्रकाशकांच्या प्रात्यक्षिक नोंदवहीचा वापर करण्याचे बंधन किंवा शक्ती विद्यार्थ्यांवर करू नये, असे अनुराधा ओक यांनी स्पष्ट केले.

# संजय राऊतांच्या सुटकेला आव्हान, मेधा सोमय्या यांची अब्रुनुकसानप्रकरणी नोटीस

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९मुंबई :** माजी खासदार किरीट सोमय्यांच्या पत्नी मेधा यांनी दाखल केलेल्या मानहानीच्या खटल्यात खासदार संजय राऊत यांच्या निर्दोष सुटकेला उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. या याचिकेची दखल घेऊन शुक्रवारी राऊत यांना न्यायालयाने नोटीस बजावून भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले.

सत्र न्यायालयाने या वर्षी फेब्रुवारीमध्ये दंडाधिकाऱ्यांचा निकाल रद्द करून संजय राऊत यांची निर्दोष सुटका केली होती. त्या आदेशाला मेधा यांनी आव्हान दिले आहे. त्यावर न्या. शिवकुमार डिगे यांच्या एकलपीठासमोर सुनावणी झाली. त्या याचिकेची दखल घेऊन न्यायालयाने राऊत यांना नोटीस बजावली आणि सुनावणी १८ जूनला सूचिबद्ध केली.

मिरा-भाईंदर महापालिकेच्या काही सार्वजनिक शौचालयांच्या बांधकाम आणि देखभालीच्या शंभर कोटी रुपयांच्या



घोटाळ्यात मेधा सोमय्या गुंतल्याचा आरोप करणारे वृत्त १५ व १६ एप्रिल २०२२ मध्ये प्रसिद्ध झाले होते. त्यानंतर मेधा यांनी राऊतांविरुद्ध मानहानीची तक्रार केली होती. हे वृत्त वाचून आपल्याला धक्का बसल्याचे म्हटले होते.

राऊतांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना केलेली वक्तव्ये ही बदनामीकारक आणि सर्वसामान्यांच्या नजरेत आपली बदनामी करणारी असल्याचा दावाही मेधा यांनी केला होता. त्याची दखल घेऊन दंडाधिकारी न्यायालयाने राऊतांना दोषी ठरवून १५ दिवसांची शिक्षा सुनावली; मात्र निर्णयाला सत्र न्यायालयात आव्हान देण्यासाठी राऊत यांना सुनावलेली शिक्षा ३० दिवसांसाठी स्थगित ठेवून त्यांना जामीनही मंजूर केला होता.

त्यानंतर, राऊत यांनी शिक्षेविरोधात सत्र न्यायालयात केलेले अपील न्यायालयाने योग्य ठरवले व त्यांची पुराव्यांअभावी बदनामीच्या आरोपांतून निर्दोष सुटका केली.

त्या निर्णयाला सोमय्यांनी आव्हान दिले आहे. सत्र न्यायालयाचा निर्णय कायद्याच्या दृष्टीने चुकीचा आणि बेकायदा असल्याचा दावा मेधा सोमय्या यांनी याचिकेत केला आहे. राऊत यांनी प्रसारमाध्यमांसमोर आपल्यासह पतीविरुद्ध निराधार व मानहानीकारक आरोप केल्याचे म्हटले आहे.

# शक्तिपीठ महामार्गासाठी लवकरच भूसंपादन प्रक्रिया

## राज्य सरकारकडून अंतर्गत हालचालींना वेग

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९नागपूर –** वर्धा, नागपूर, हिंगोली, नांदेड, परभणी, लातूर, धाराशिव, सोलापूर, सांगली, सातारा, कोल्हापूर आणि सिंधुदुर्ग या १३ जिल्ह्यांना जोडणाऱ्या महत्त्वाकांक्षी नागपूर-गोवा शक्तिपीठ महामार्ग प्रकल्पासाठी राज्य सरकारने हालचालींना वेग दिला आहे. महामार्गाच्या सुधारित आराखड्याची अधिसूचना जारी करण्यात आली असून, आता प्रत्यक्ष भूसंपादन प्रक्रियेला सुरुवात होणार आहे.




महाराष्ट्र राज्य रस्ता विकास महामंडळाकडून (एमएसआरडीसी) यासाठी तयारी सुरू करण्यात आली असून, या वर्षाअखेर भूसंपादन पूर्ण करून पुढील वर्षाच्या सुरुवातीला महामार्गाच्या कामाला गती देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. विदर्भाला थेट गोवा राज्याशी जोडणारा हा प्रवेश नियंत्रित महामार्ग वर्धा जिल्ह्यातील दिग्रसपासून सिंधुदुर्गातील बांदा येथे संपणार आहे.

एमएसआरडीसीकडून उभारण्यात येणारा हा महामार्ग १३ जिल्हे, ८० तालुके आणि सुमारे ९०० गावांमधून जाणार असून, प्रकल्पासाठी अंदाजे १ लाख १ हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. राज्य सरकारने यापूर्वी या महामार्गाच्या सुधारित आराखड्यास मंजुरी दिली होती. त्यानंतर आता आराखडा अधिकृतरीत्या जाहीर करण्यात आला असून, अधिसूचनाही प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीचा मार्ग मोकळा झाला आहे. प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या १०७७ गावांमधील जमिनींची संयुक्त मोजणी यापूर्वीच पूर्ण झाली आहे.

सुधारित आराखड्यानुसार आता पुन्हा संयुक्त मोजणीची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. पावसाळ्यापूर्वी बहुतांश प्राथमिक कामे पूर्ण करण्याचा प्रशासनाचा प्रयत्न असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. संयुक्त मोजणी पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्ष भूसंपादनास सुरुवात होणार आहे. तसेच या वर्षाअखेर निविदा प्रक्रिया राबवून पुढील वर्षात महामार्गाच्या कामाला प्रारंभ करण्याचे नियोजन एमएसआरडीसीकडून करण्यात आल्याची माहिती सुत्रांकडून मिळाली आहे.

## संपादकीय ......

# ज्येष्ठ नागरिकांचे जगणे अवघड!

*राष्ट्रीय गुन्हे नोंदणीच्या अहवालाची ताजी आकडेवारी नुकतीच समोर आली आहे. ही आकडेवारी देशातील ज्येष्ठ नागरिकांच्या चिंतेत भर घालणारी म्हणावी लागेल. या मागचे कारण म्हणजे मागच्या काही वर्षांमध्ये ज्येष्ठ नागरिक वाढत्या गुन्हेगारीचा बळी ठरू लागले आहेत. प्रत्येक राज्यांमध्ये ज्येष्ठ नागरिकांशी संबंधित गुन्हे वाढत आहेत. त्यातही महाराष्ट्र राज्य ज्येष्ठ नागरिकांसाठी अधिकाधिक असुरक्षित होत चालले असून, ज्येष्ठांच्या संदर्भात देशात दुसर्या क्रमांकाचे गुन्हे महाराष्ट्रात घडणे हे राज्याच्या कायदा-सुव्यवस्थेसाठी नक्कीच अशोभनीय आहे. 'एनसीआरबी'च्या आकडेवारीनुसार २०२४ मध्ये देशात ६० वर्षे किंवा त्याहून अधिक वयाच्या ज्येष्ठ नागरिकांशी निगडित एकूण ३१,०६७ गुन्हे दाखल झाले होते. २०२३ मध्ये हाच आकडा २६,३०६ इतका होता. म्हणजेच केवळ वर्षभरात ज्येष्ठ नागरिकांशी निगडित गुन्ह्यात सुमारे १७ टक्क्यांनी वाढ झाली. याच काळात मध्य प्रदेशमध्ये ज्येष्ठांशी संबंधित ५, ८७५ गुन्हे, तर महाराष्ट्रात ४, ९१८ गुन्ह्यांची नोंद झाली. शहरांचा विचार केल्यास देशात दिल्लीपाठोपाठ मुंबई ज्येष्ठांसाठी असुरक्षित बनली आहे. 'एनसीआरबी'कडून दरवर्षी विविध प्रकारच्या गुन्ह्यांची आकडेवारी जाहीर केली जाते. या आकडेवारीत गुन्ह्यांचे प्रकार आणि गुन्ह्यांशी संबंधित व्यक्तीचे लिंग व वयाची माहितीदेखील दिलेली असते. या आकडेवारीचे पृथ्थकरण केल्यानंतर समाजातला नेमका कुठला घटक गुन्हेगारीचा बळी ठरतो आहे आणि त्यामागचे कारणही चकटन लक्षात येते. ज्येष्ठ नागरिकांशी निगडित गुन्ह्यांबाबत सांगायचे झाल्यास त्यांचे एकटे राहणे हे गुन्हेगारीला बळी पडण्यामागचे मोठे कारण असल्याचे तज्ज्ञ नमूद करतात.*

*बदलत्या काळानुसार भारतातही संयुक्त कुटुंब पद्धतीचा र्हास होऊन विभक्त कुटुंब पद्धतीला महत्त्व प्राप्त झाले आहे. कधीकाळी एकाच घरात किंवा वाडीत आई-वडील, आजी-आजोबा, काका-काकू, आत्या, चुलत भावंडे व इतर नातेवाईक रहायचे. प्रत्येक गोष्ट एकमेकांना सांगितली वा विचारली जायची, एकमेकांच्या सल्ल्याने निर्णय घेतले जायचे. कुटुंबातील सदस्य एकमेकांच्या अडीअडचणीच्या वेळी धावून यायचे. एकमेकांना मानसिक, सामाजिक, आर्थिक सर्वच प्रकारचा आधार दिला जायचा. परंतु आता नवा संसार थाटण्याआधीच मुले विभक्त होण्याची स्वप्न बघू लागतात. आई-वडिलांपासून वेगळे राहण्यामागे निर्णय स्वातंत्र्य, वडीलधार्यांचा हस्तक्षेप नको, वादविवादापासून चार हात लांब राहण्याची भूमिका असते. तसे बघायला गेल्यास दोन्ही कुटुंब पद्धतीचे आपापले फायदे आणि तोटे आहेत. त्यातल्याच एका तोट्याचा ज्येष्ठ नागरिकांना फटका बसतो आहे. प्रामुख्याने महानगरांमध्ये ज्येष्ठ नागरिक वा वयोवृद्ध जोडपे एकटे रहातात. यातील काही पेन्शनर असतात, तर काहींनी वेगवेगळ्या ठिकाणी आर्थिक गुंतवणूक केलेली असते. वाढलेल्या वयामुळे त्यांना बँकेचे किंवा इतर आर्थिक व्यवहार करताना बर्याचदा इतरांची मदत घ्यावी लागते. उदाहरणार्थ बँकेतून रोकड काढण्याची किंवा टाकण्याची स्लीप भरणे किंवा एटीएममधून रोकड काढताना त्यांची अनेकदा धांदल उडते. यावेळी मदत करणारा सद्गृहस्थ असला तर ठिक अन्यथा कुठल्याही चोर भामट्याकडून त्यांची फसवणूक झालीच म्हणून समजा. अनेकदा तर मोठी रोकड सांभाळून घरी आणेपर्यंत त्यांचा श्वास वर खाली होत असतो. एखाद्या चोराने वाटेत गाठून बॅग हिसकावू नये अशी धास्ती त्यांना सतत वाटत असते. एकटेपणाची भीती त्यांच्या मनात घर करुन बसलेली असते. आता बहुतांश ज्येष्ठ नागरिकांच्या हाती जुन्या फिचर फोनऐवजी स्मार्ट फोन आलेत. सायबर चोरांसाठी तर हे स्मार्टफोन म्हणजे ज्येष्ठांची बँक खाती रिकामी करण्याचे साधनच बनले आहेत. कधी केवायसीच्या बहाण्याने, तर कधी जीपेचा ओटीपी क्रमांक मागून, कधी लॉटरीत जिंकल्याचे सांगून, तर कधी डिजिटल अरेस्टच्या नावाने ज्येष्ठ नागरिकांना धमकावून त्यांचे पैसे लुबाडले जात आहेत. एकटे राहणारे ज्येष्ठ नागरिक गुन्हेगारांचे सॉफ्ट टार्गेट ठरतात. बहुतेक ज्येष्ठांकडे साफसफाईसाठी, जेवण बनवण्यासाठी किंवा केअर टेकर म्हणून घरगडी ठेवलेले असतात. हे घरकामगार देखील ज्येष्ठ नागरिकांची फसवणूक करण्यात पटाईत असतात. घरामध्ये चोरी करणे, इतर वेगवेगळ्या प्रकारे त्यांची आर्थिक फसवणूक करण्याच्या गुन्ह्यांमध्ये घर कामगार मुख्य आरोपी असल्याचे आढळून आले आहे.*

*अनेकदा तर ज्येष्ठ नागरिक त्यांच्या हिंसेलाही बळी पडतात. अनेक प्रकरणांमध्ये घरात एकटे राहणार्या ज्येष्ठ नागरिकांच्या हत्याही झाल्या आहेत. पैशांसाठी घरातील कामगारानेच ज्येष्ठ नागरिकांचा खून केल्याचे प्रकारही घडले आहेत. ज्येष्ठ नागरिकांना फसवणार्यांमध्ये प्रामुख्याने त्यांच्या ओळखीचेच लोक जास्त असतात. कधी ते घर कामगार असतात, कधी नातेवाईक, ओळखीचे किंवा कधी स्वत:चीच मुले असतात. या लोकांकडून ज्येष्ठ नागरिकांच्या असहायतेचा फायदा उचलला जातो. मध्यंतरी देशातील एका मोठ्या उद्योगपतीने सर्व संपत्ती आपल्या मुलाच्या नावावर केली होती. मात्र, काही महिन्यातच मुलाने वडिलांना घरातून बाहेर काढल्याने त्यांना मरेपर्यंत भाड्याच्या घरात राहावे लागले. अशा अनेक घटना आपल्या आजूबाजूला घडत असतात. परिणामी ज्येष्ठांना उतारवयात हलाखीचे जीवन जगावे लागते.*

*ज्येष्ठांवरील वाढत्या गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर ठाणे पोलिसांनी एक स्तुत्य उपक्रम हाती घेतला होता. महानगरातील सर्व सोसायट्यांमध्ये एकटे व जोडप्याने राहणार्या ज्येष्ठ नागरिकांची यादी पोलिसांनी बनवली आणि या यादीच्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिकांना वेळोवळी भेटून त्यांच्या अडीअडचणी समजून घेण्यास सुरुवात केली. त्यासाठी प्रत्येक पोलीस ठाण्यात एक स्वतंत्र पथक निर्माण करण्यात आले. अशा प्रकारे ठाण्यात गेल्या वर्षभरात ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेसाठी पोलिसांनी शंभरहून अधिक बैठका घेतल्या. त्यात ९ हजार ज्येष्ठ नागरिकांनी सहभाग घेतला. खरे तर असे उपक्रम देशभरात राबवण्याची गरज आहे. यातून ज्येष्ठांना सुरक्षेसोबत मानसिक आधारही मिळू शकेल. ज्या समाजात लहान मुली, महिला, ज्येष्ठ नागरिक सुरक्षित तोच समाज सुसंस्कृत म्हणायला हवा.*

# विद्यार्थ्यांसाठी शिक्षकांची भर उन्हात भटकंती

## प्रवेशासाठी गृहभेटी ; पटसंख्या टिकविण्याची धडपड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

सध्या शाळांमध्ये प्रवेशाची धुम सुरु आहे. दुसरीकडे बऱ्याच शाळेचे शिक्षक विद्यार्थ्यांसाठी वणवण फिरताना दिसत आहेत. यात शासकीय शाळांपेक्षा खासगी शाळेतील शिक्षकांची संख्या अधिक असल्याचे चित्र पहायला मिळत आहेत. सध्या इंग्रजी माध्यमाच्या शाळा शहरासह ग्रामीण भागात पर्यंत सर्वदूर उभ्या झाल्या आहेत. गेल्या काही वर्षात पालक वर्गांचा कलही इंग्रजी माध्यमिक शाळेकडे अधिक पाहायला मिळत आहे. परिणामी जिल्हा परिषद, नगरपरिषद तथा बर्याच अनुदानित खासगी शाळांतील पटसंख्येत गेल्या काही वर्षात लक्षणिय घट झाली आहे. काही शाळा विद्यार्थीअभावी अक्षरशः



ओस पडत असल्याचे वास्तव चित्र आहे. सध्या बऱ्याच शाळांमधील शिक्षक ऍडमिशनच्या शोधत गावोगावी फिरताना दिसत आहेत. ऍडमिशन साठी फिरत असलेल्या शिक्षकामध्ये शासकीय शाळा पेक्षा खासगी शाळेतील शिक्षकांची संख्या अधिक पहायला मिळत आहे. शाळेची पटसंख्या टिकवण्यासाठी बरेच शिक्षक पालकांच्या घरी जाऊन गृहभेट देत आहेत. काहींकडून प्रवेश मिळवण्यासाठी मोठी आश्वासने दिल्या जात असल्याची ओरड आहे. मुलांना व पालकांना आपल्या येथील शिक्षण, गुणवत्ता, सोयी सुविधासह राबवत असलेले उपक्रम व कार्यक्रमाची माहिती देण्यासोबत विविध प्रलोभनेही पालकांना दिल्या जात असल्याचे बोलले जात आहे.

### विशेष प्रयत्न आवश्यक

शासकीय शाळेत सोयी सुविधा वाढवण्यासह विद्यार्थी वाढवण्यासाठी शिक्षक, मुख्याध्यापक आदी संबंधित अधिकाऱ्यांकडून विशेष प्रयत्न गतिमान करणे गरजेचे असल्याच्या भावना व्यक्त होत आहे.

## माझ्या आठवणीतले

# स्व.प्रकाशदादा...

स्व.प्रकाशदादा सन २००९ मध्ये आमदार झाले. त्याच दरम्यान मी कारंजा लाड येथे वन विभागात रुजू झालो. कारंजा शहराच्या मध्यभागी वनविभागाची अंदाजीत २ ते ३ हजार कोटी रुपये किंमत असलेली २५० एकर जमिन वर्षानुवर्षांपासून पडून होती. भविष्यात अतिक्रमण किंवा इतर कारणाने गिळंकृत होण्याची दाट शक्यता असल्यामुळे कारंजा शहराकरीता एक सुंदर वनपर्यटन केंद्र निर्माण करण्याची संकल्पना मनामध्ये रुजली. स्व. प्रकाश दादा यांची त्वरीत भेट घेऊन प्रकल्प निर्माण करण्याबाबत कल्पना मांडली. दादांनी अत्यंत आनंदाने प्रस्ताव मान्य करुन तात्काळ निधी उपलब्ध करुन दिला. वनपर्यटन प्रकल्पाचे दादाच्या शुभहस्ते २०१० मध्ये भुमीपुजन करुन कामास वेगाने सुरुवात केली. केवळ ३ वर्षात प्रकल्प पूर्ण करुन प्रकाशदादा यांच्याच शुभहस्ते लोकार्पण करण्यात आले.कारंजा येथील वनपर्यटन केंद्र राज्यातील पहीला एक नाविण्यपूर्ण यशस्वी प्रयोग ठरला.निवृत्तीनंतर मी अमरावतीला स्थायीक झालो. १० मे २०२१ ला दादांच्या निधनाची अत्यंत दुःखद बातमी कळली. कोरोना असल्यामुळे इच्छा असूनही अत्यंसंस्काला जाऊ शकत नव्हतो. प्रकल्पाच्या संपूर्ण कामाला फक्त प्रकाश दादांनीच निधी उपलब्ध करुन दिल्याने प्रकाश दादांचे कायमस्वरुपी नाव राहावे हा विचार मनात आला. दादांच्या अंत्यसंस्काराला ना. दिलीप वळसे पाटील साहेब नक्कीच येणार याची जाणीव मला होती. त्यामुळे कारंजा वनपर्यटनाला स्व. प्रकाशदादांचे नाव देण्यासंबधीचे निवेदन अमरावतीला तात्काळ तयार करुन कारंजातील प्रतिष्ठीत नागरीकांच्या सहया घेऊन निवेदन



कारंजा येथे ना. दिलीप वळसे पाटील साहेबांना सादर केले. ना. दिलीप वळसे पाटील साहेबांनी स्वतः वैयक्तीक लक्ष घालून शासनाकडून तात्काळ प्रस्ताव मंजूर करुन घेतला.वनपर्यटन केंद्र निर्माण करण्याकरीता लोकमतचे तालुका प्रतिनिधी स्व. दिवाकरराव इंगोले, विवेक चांदूरकर, निलेशजी हेडा, डी.एफ.ओ. प्रकाश महाजन, वनपाल अशोक थोरात, स्व. दिनेश हरणे व गजानन थेर यांनी भरीव सहकार्य केले. मागील १२ वर्षापासून परीसरातील विद्यार्थी, जेष्ठ नागरीक हजारोच्या संख्येने दररोज पर्यटन केंद्राचा आनंद घेत आहे.स्व. प्रकाशदादा आज जरी आपल्यात नसले तरी स्व. प्रकाश दादा निसर्ग पर्यटन केंद्राच्या रुपाने आपणास प्रकाश दादांची सदैव आठवण देत राहील, यात कुठलीही शंका नाही. स्व. प्रकाश दादांना पाचव्या पुण्यस्मरणार्थ भावपुर्ण श्रध्दांजली. **अशोक कविटकर**

वनअधिकारी (निवृत्त) ह. मुक्कामः अमेरिका (टेक्सास)मो. ९४२३१२५१३५

# पोटे अभियांत्रिकी महाविद्यालयाला प्रथम पारितोषिक

## विद्यापीठाच्या आंतर महाविद्यालयीन वार्षिकांक स्पर्धेत बाजी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठच्या वतीने आयोजित आंतर महाविद्यालयीन वार्षिकांक स्पर्धेमध्ये व्यावसायिक (शहरी व ग्रामीण) गटातून पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन यांच्या वार्षिकांकाला प्रथम पारितोषिक प्राप्त झाले आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यापीठाच्या वतीने महाविद्यालयाला सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र प्रदान करून सन्मानित करण्यात आले. महाविद्यालयाचा वार्षिकांक हा विद्यार्थ्यांच्या साहित्यिक, कलात्मक व सर्जनशील अभिव्यक्तीचे प्रभावी माध्यम मानला जातो. विद्यार्थ्यांमधील विविध गुणांना प्रोत्साहन देत त्यांच्या कल्पकतेला व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य वार्षिकांकाद्वारे केले जाते. पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या वार्षिकांकात विद्यार्थ्यांचे लेख, कविता, चित्रकला, विविध विभागांचे उपक्रम, महाविद्यालयीन उपलब्धी तसेच सामाजिक व शैक्षणिक कार्याचा समावेश करण्यात आला होता. वार्षिकांकाची आकर्षक मांडणी, दर्जेदार साहित्य आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे विद्यापीठ स्तरावर या वार्षिकांकाला प्रथम क्रमांकाचा मान मिळाला. या यशामुळे महाविद्यालय परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून संस्थेच्या शैक्षणिक व सांस्कृतिक कार्याला आणखी एक मानाचा बहुमान प्राप्त झाला आहे. या यशाबद्दल संस्थेचे प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक, संपादक मंडळ तसेच विद्यार्थ्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे.

# श्रीक्षेत्र नागठाणा जैन मंदिरात मुर्त्यांची चोरी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९वरुड–** रवाळा येथील श्री क्षेत्र नागठाणा परिसरातील जैन मंदिरातील मुर्त्यांची अज्ञात चोरट्याने चोरी केल्याने याप्रकरणी शे.घाट पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली आहे. माहितीनुसार, रूपेश किशोर इंदाने हे गेल्या सात वर्षापासून नागठाणा जैन मंदीरात पुजारीचे काम पाहतात. ६ मे रोजी रात्री अकराच्या सुमारास जैन मंदीरातील वेदीवरील पितळी अष्टधातुच्या संपूर्ण मुर्त्या मंदीरात व्यवस्थितीत ठेवल्या होत्या.

यावेळी मंदीरातील काम पाहणारे २ माताजी व एक जैन साधू असे एकूण १० लोक मंदीरातील खोल्यांमध्ये निद्रा घेत



होते. पहाटे पाचच्या सुमारास लता महात्मे हिने रूपेशला येऊन सांगितले की, मंदीरातील एकूण पाच मुर्त्या व एका मुर्ती वरील छत्र दिसून येत नाही. त्यामुळे मंदीरातील मुर्त्याची पाहणी केली तेव्हा ९ इंच उंचीची ११ किलो वजनाची २१ हजाराची श्री आदिनाथ स्वामिची मूर्ती, ७ इंच उंचीची ५ किलो वजनाची ९ हजाराची मुनीसुव्रतनाथांची मुर्ती, ५ इंच उंचीची ४ किलो वजनाची ७ हजाराची श्री विमलसागर गुरूमुर्ती, ५ इंच उंचीची ४ किलो वजनाची ७ हजाराची सन्मती सागर गुरूमुर्ती, ७ इंच उंचीची ५ किलो वजनाची ९ हजाराची पद्मावती देवीमुर्ती, ४ हजाराचे पाषान मुर्ती वरील २ किलो वजनाचे छत्र अशा प्रकारे वेदीवरील ठेवलेल्या अष्ट धातुच्या मुर्त्या व एका पाषाण मुर्ती वरील ३१ किलो वजनाचे ५७ हजाराचे छत्र अज्ञात चोरटयाने लंपास केल्याचे आढळून आले. या प्रकरणी पुजारी रूपेश इंदाने यांनी शे.घाट पोलिसांत ७ मे रोजी तक्रार दाखल केली आहे. पोलिसांचा तपास सुरू आहे.

# पथ्रोटचे पर्जन्यमापक यंत्र सुरळीत; प्रशासनाला दिलासा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९पथ्रोट–** शासनाने मंडळामध्ये बसविलेले पर्जन्यमापक यंत्रापैकी पथ्रोटचे पर्जन्यमापक यंत्र हे ओलीताच्या सानिध्यात असल्यामुळे इतर मंडळांच्या तुलनेत तापमानाच्या आकडेवारीत फरक दिसून येत आहे. हा फरक हवामान आधारित विमा कंपनीकडे वर्ग करण्यात येत असल्याने पुढे त्यांच्याकडून मिळणारी मदत ही शेतकऱ्यांसाठी तोट्याचे संकेत देत आहे. अशा प्रकारचा सूर उमटल्यानंतर हवामान विभागातील तंत्रज्ञ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर पथ्रोटचे पर्जन्यमापक यंत्र योग्य कार्यरत असून मंडळाच्या आकडेवारीत कोणतेही तफावत नसून शेतकऱ्यांसाठी शुभ संकेत असल्याचे मत व्यक्त केले आहे. शासनाकडून निर्धारित केलेल्या मंडळात परतवाडा, देवमाळी, परसापूर, पथ्रोट, रासेगाव व असदपूर अशा सहा ठिकाणी पर्जन्यमापक यंत्र बसविण्यात आले आहे. १७ एप्रिल रोजी १२. ५३ मिनिटांनी पथ्रोट येथे उष्ण तापमानाचा आकडा हा ३७ डिग्री सेल्सिअस होता. त्यानंतर अवघ्या दहा मिनिटांच्या कालावधीत परतवाडा देवमाळी चाळीस डिग्री, परसापूर बेचाळीस डिग्री, पथ्रोट ३७ डिग्री, रासेगाव असदपूर ४१ डिग्री सेल्सिची नोंद घेण्यात आली होती. सूर्यदेवतेचे उष्णतामान एकसारखे असताना ओलीत व कोरडवाहू क्षेत्रात लावण्यात आलेल्या पर्जन्यमापक केंद्रावर तफावत दाखविणारी आकडेवारी दिसत असल्याने हवामान विभागाने सदरचे पर्जन्यमापक यंत्र हे योग्य ठिकाणी लावावे, जेणेकरून हवामान आधारित पिक विमा सारख्या शासनाच्या योजनांचा शेतकऱ्यांना व्यवस्थित लाभ मिळणे सोयीचे होईल, नाहीतर सूर्यदेव पथ्रोटवरच मेहरबान होते का, असा प्रश्न



उपस्थित होऊन वाद उत्पन्न होण्याआधीच हवामान विभागाने शेतकऱ्यांच्या हितासाठी योग्य ती खबरदारी घ्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात आली होती. उष्ण तापमानाची आकडेवारी या पर्जन्यमापक यंत्रामध्ये मोजल्या जाते. तेथून ती थेट शासन दरबारी पोहोचविली जाते. ती आकडेवारी शासन दरबारातून विमा कंपनीकडे वर्ग करण्यात येते. शेतकऱ्यांना हवामान आधारित विमा मंजूर करताना या आकडेवारीवरून मदत देण्याचे निकष ठरविल्या जातात. ज्या पर्जन्यमापक यंत्रावरील आकडेवारी अधिक उष्ण तापमानाची तिथे मदत मंजूर केली जाते. परंतु फक्त ओलीत क्षेत्राच्या सानिध्यात असलेल्या पर्जन्यमापक यंत्रामुळे जर का उष्ण तापमानाचा आकडा शासन दरबारी कमी नोंद होत असेल तर त्या ठिकाणावरून विमा कंपनीला पाठविण्यात आलेल्या कमी आकडेवारीमुळे शेतकऱ्यांना हक्काची मदत मिळण्यापासून वंचित राहावे लागणार आहे. असा प्रश्न शेतकऱ्यांच्या मनात उपस्थित झाला होता.

पथ्रोटच्या पर्जन्यमापक यंत्राजवळ आकडेवारी मोजण्यासाठी बसविण्यात आलेल्या सेंसरची तपासणी केली असता असा कुठलाही फरक जाणून आला नाही. मोबाईल मधील रीडिंग व सेंसरचे रिडींग यात तफावत असते. याबाबत कृषी विभागाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना अधिक आणि योग्य प्रकारची माहिती उपलब्ध होऊ शकते.

**– गौरव बोके** तंत्रज्ञ अधिकारी, हवामान विभाग.

# २१५ अंध कुटुंबांना जीवनावश्यक धान्याचे वाटप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

कच्छ विसा ओसवाल दृष्टी फाउंडेशन फॉर द ब्लाइंड, माटुंगा (मुंबई) यांच्या सहकार्याने भारतीय अंधजन विकास व पुनर्वसन संस्थेतर्फे दर महिन्याच्या पहिल्या रविवारी अंध कुटुंबांना जीवनावश्यक धान्याचे वाटप करण्यात येते. कच्छ विसा ओसवाल संघाच्या अमरावती शाखेचे धीरेन गाला यांच्या माध्यमातून आणि भारतीय अंधजन संस्थेचे महासचिव शाकीर नाईक यांच्या विनंतीवरून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यावेळी तब्बल २१५ अंध कुटुंबांना सुमारे दीड लाख रुपयांच्या धान्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास क्षितिज फुटाणे, प्रभा आवारे, प्रवीण वासनिक, विवेक सहस्त्रबुद्धे, लक्ष्मण तडस, रामदास वडवाले आणि डॉ. गोविंद कासद उपस्थित होते. प्रास्ताविक सागर नाईक यांनी केले. तसेच मित्रमंडळातर्फे ओसवाल विसा संघ अमरावती शाखेचे प्रमुख धीरेन गाला यांचा सत्कार करण्यात आला.





सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# सकारात्मक पत्ता पडताळणी अहवालासाठी स्वीकारले ५० हजार

## दोघे भातकुली पं.स.मध्ये कार्यरत : एसीबीचा रुक्मिणीनगरात ट्रॅप

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती** निवासी पत्त्याची पडताळणी करण्यासाठी सकारात्मक अहवाल पाठविण्याकरीता ५० हजार रुपये लाच स्वीकारल्या प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने भातकुली पंचायत समितीच्या प्रभारी केंद्र प्रमुखासह विषय साधन व्यक्ती पदावर कार्यरत कर्मचाऱ्याला अटक केली आहे. नरेंद्र गोपाळकृष्ण धनस्कर (वय ५४, रा. बापू कॉलनी, कंवरनगर, अमरावती) व हर्षवर्धन वासुदेवराव इंगळे (वय ४२, रा. संतोषीमाता कॉलनी, व्हीएमव्ही रोड, अमरावती) असे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या ट्रॅपमध्ये अडकलेल्या दोघांची नावे असल्याची माहिती पोलिस निरीक्षक सुजाता बनसोड यांनी दिली. धनस्कर हे भातकुली पंचायत समितीत प्रभारी केंद्र प्रमुख असून, इंगळे हे विषय साधन व्यक्ती या पदावर (कंत्राटी) कार्यरत आहे. शहरातील तक्रारकर्त्या व्यक्तीच्या मुलीला पहिल्या वर्गात प्रवेश हवा असल्यामुळे त्यांनी मुलीचे शिक्षणाचा अधिकारी अंतर्गत १९ फेब्रुवारी २०२६ रोजी ऑनलाइन पद्धतीने अर्ज सादर केला होता. लॉटरी पद्धतीने तक्रारकर्ता यांच्या मुलीला तोमई प्रि इंग्लिश स्कूल कठोरा (बुद्रूक) ही शाळा मिळाली आहे. त्याबाबतचे ऑनलाइन माहिती तक्रारकर्ता यांना मिळाली. शाळा मिळाल्यानंतर तक्रारकर्त्याने ३० एप्रिल २०२६ रोजी पत्ता पडताळणी करिता ऑनलाइन अर्जातील पत्त्याप्रमाणे पडताळणीकरीता भातकुली पंचायत समितीचे हर्षवर्धन इंगळे व श्री. धनस्कर हे दोघे आले. त्यांनी तुम्ही ऑनलाइन दिलेल्या पत्त्यावर राहत नाही. त्यामुळे मुलीला तोमई प्रि इंग्लिश स्कूल कठोरा येथे प्रवेश मिळू शकत नाही. त्याच ठिकाणी प्रवेश हवा असेल तर, तुमचा पडताळणी अहवाल सकारात्मक पाठवितो. त्यासाठी ५० हजार रुपये लाचेची मागणी केली. लाचेची रक्कम देण्यापूर्वी संबंधिताने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली होती. लाचेची ५० हजारांची रक्कम रक्मिणीनगर येथील एका पेंटच्या दुकानासमोर हर्षवर्धन इंगळे यांनी स्वीकारली. त्यावेळी त्याच्यासोबत नरेंद्र धनस्कर हे सुद्धा हजर होते. दोघांनाही लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली असून, त्यांच्याविरुद्ध राजापेठ ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.



> जनगणना ही केवळ शासकीय प्रक्रिया नसून देशाच्या विकास आराखड्याचा पाया आहे. त्यामुळे सर्वांनी स्व-गणनेत सक्रिय सहभाग नोंदवून ही मोहीम यशस्वी करावी.
>
> – **सत्यम गांधी**, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

# १५ मेपूर्वी प्रक्रिया पूर्ण करण्याचे सीईओ सत्यम गांधी यांचे निर्देश

## जनगणनेसाठी डिजिटल स्व-गणना पूर्ण करा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती –** जनगणनेंतर्गत पहिल्या टप्प्यात होणाऱ्या घरयादी व घरगणना प्रक्रियेसाठी जिल्हा परिषद प्रशासनाने डिजिटल स्व-गणनेला प्राधान्य देत सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना अनिवार्यपणे स्व-गणना पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी परिपत्रक जारी केले आहे. सीईओंच्या सूचनेनुसार १ ते १५ मे या कालावधीत शासनाच्या अधिकृत पोर्टलवर डिजिटल पद्धतीने स्व-गणना करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. नागरिकांनी शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन स्व-गणना पूर्ण करावी, असे आवाहन प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.



स्व-गणनेसाठी विचारण्यात येणाऱ्या केवळ ३३ प्रश्नांची अचूक उत्तरे देऊन नागरिक स्वतःची माहिती ऑनलाइन पद्धतीने भरू शकणार आहेत. या उपक्रमामुळे माहिती भरण्याची प्रक्रिया अधिक सुरक्षित, सुलभ व सोयीस्कर होणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. जिल्हा परिषदेंतर्गत मुख्यालय, पंचायत समित्या, तालुका कार्यालये, शिक्षक संवर्ग, ग्रामपंचायत अधिकारी, आरोग्य कर्मचारी तसेच पंचायत समिती कार्यक्षेत्रातील निमशासकीय कर्मचारी, डाटा ऑपरेटर, युवा प्रशिक्षणार्थी आणि इतर सर्व प्रकारच्या कर्मचाऱ्यांनी स्व-गणना अनिवार्यपणे पूर्ण करावी, असे निर्देश सीईओ श्री. गांधी यांनी दिले आहेत. तसेच सर्व कार्यालय प्रमुखांना त्यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी स्व-गणना पूर्ण केल्यानंतर स्व-गणनेचे डिजिटल प्रमाणपत्राची खातरजमा करून संवर्गनिहाय माहिती विहित नमुन्यात सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. संबंधित माहिती १५ मे २०२६ पूर्वी ई-मेलद्वारे पाठविण्याचेही आदेश परिपत्रकात नमूद करण्यात आले आहेत.

# जिल्हा परिषदेमध्ये अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन

## बदलीनंतरही जनगणनेची जबाबदारी पार पाडण्याचे निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती–** जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागामार्फत अतिरिक्त विषय शिक्षक समायोजन प्रक्रिया आज डॉ. पंजाबराव देशमुख सभागृहात मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. शिक्षकांचे समायोजन नियोजनबद्ध आणि शिस्तबद्ध वातावरणात करण्यात आले. या समायोजन प्रक्रियेमध्ये विषय शिक्षक भाषा (मराठी माध्यम) प्रवर्गातील २५ शिक्षक, विषय शिक्षक सामाजिक शास्त्र प्रवर्गातील १८ शिक्षक तसेच विषय शिक्षक सामाजिक शास्त्र



(उर्दू विभाग) प्रवर्गातील २ शिक्षकांचा समावेश होता. एकूण ४५ अतिरिक्त शिक्षकांपैकी ४४ शिक्षकांचे यशस्वीपणे समायोजन करण्यात आले. देशाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या जनगणना कार्यात कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होता कामा नये. जनगणना कार्यक्रमासाठी कर्तव्य बजावत असलेल्या शिक्षकांनी समायोजनानुसार बदली झालेल्या शाळेत नियमानुसार रुजू व्हावे आणि त्यानंतर जनगणनेचे काम सुरळीतपणे पार पाडण्यासाठी मूळ शाळेत उपस्थित राहून जबाबदारी पार पाडावी, असे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी यांनी यावेळी दिले. यावेळी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) सतीश मुगल, अधीक्षक नरेंद्र गायकवाड, सहायक प्रशासन अधिकारी संजय मुंद्रे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी पंकज गुल्हाने, वरिष्ठ सहाय्यक विजय मालोकर, शरद चहाकार, कनिष्ठ सहाय्यक संजय वाघमारे, अनिकेत हुरडे उपस्थित होते.

# समृद्धी महामार्गावर धावत्या कारने घेतला पेट

## सुदैवाने जीवितहानी टळली

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.९ धामणगाव रेल्वे**

समृद्धी महामार्गावर पुन्हा एकदा धावत्या वाहनाला आग लागल्याची घटना घडली. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. तळणी फाट्यानजिक शुक्रवारी (दि. ८) रात्री ८ च्या दरम्यान दरम्यान ही घटना घडली. रेनॉल्ट डस्टर (क्र. एमएच-१५ एफटी-१३२७) या कारने अचानक पेट घेतल्याने काहीवेळ परिसरात खळबळ उडाली होती.

प्राथमिक माहितीनुसार, संबंधित कारमध्ये एक महिला व दोन पुरुष प्रवास करीत होते. प्रवासादरम्यान अचानक वाहनातून धूर निघू लागला आणि काही



क्षणातच कारने पेट घेतला. स्पार्किंगमुळे आग लागलीअसावी, असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. समृद्धी दृतगती मार्गाने डस्टर कार नागपूरहून पुणे येथे जात होती. दरम्यान धावत्या कारने अचानक पेट घेतला. चालकाने तात्काळ कार बाजूला थांबून कारमधील प्रवासी एक महिला व दोन पुरुष घाईने बाहेर आले. बघता बघता आगडोंब उठू लागले व कार जागीच राख होऊ लागली. येथील माजी जि.प. सदस्य रामदास निस्ताने यांनी तातडीने प्रशासनाला माहिती दिली. त्यानंतर अग्निशमन विभागाचे पथक व मंगरूळ दस्तगिर पोलीस घटनास्थळी दाखल झाले व आग विझविण्याचे प्रयत्न सुरू करण्यात आले. आगीमुळे वाहनाचे मोठ्याप्रमाणात नुकसान झाले. दरम्यान, समृद्धी महामार्गावरील अपघात आणि दुर्घटनांची मालिका थांबण्याचे नाव घेत नसल्याचे चित्र आहे कधी चालकाला आलेली झोपेची डुलकी, तर कधी भरधाव वाहनावरील नियंत्रण सुटल्याने अपघात घडत आहेत. सध्या वाढत्या उन्हाच्य तडाख्यामुळे वाहनांमध्ये तांत्रिक बिघाड व स्पर्किंगमुळे अपघाताच्य घटनांमध्येही वाढ होताना दिसत आहे.

## भातकुली पंचायत समिती परिसरात

# दारूच्या बाटल्यांचा खच

## रंगीन पार्टी-जुगाराची चर्चा, चौकशीची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९ अमरावती**

अमरावती जिल्ह्यातील भातकुली पंचायत समिती परिसरात मोठ्या प्रमाणात दारूच्या रिकाम्या बाटल्या, प्लास्टिक पावट्या तसेच पत्त्यांचे कागदी पाकीट आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. सरकारी कार्यालयाच्या आवारातच हा प्रकार उघडकीस आल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. पंचायत समिती कार्यालयात रात्रीच्या वेळी रंगीन पार्टी किंवा जुगाराचे प्रकार सुरू असावेत, अशी चर्चा आता जोर धरू लागली आहे.विशेष म्हणजे पंचायत समितीच्या मागील बाजूस असलेल्या उमेद बचत गट कार्यालय परिसरातही मद्याच्या बाटल्या मोठ्या प्रमाणात आढळून आल्याने संशय अधिक गडद झाला आहे. परिसरात कोणतेही वाईन शॉप अथवा बिअर बार नसताना एवढ्या प्रमाणात मद्याच्या बाटल्या नेमक्या कुठून आल्या,




असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत.या संपूर्ण प्रकारामुळे पंचायत समिती प्रशासन अडचणीत आले असून गटविकास अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षावरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. संबंधित प्रकाराची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच पंचायत समिती परिसरात सुरक्षा व्यवस्था वाढवावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# सिमेंट रस्त्यालगतच्या नालीचे काम रखडले

## वॉर्ड चारमधील नागरिक संतप्त, आंदोलनाचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अंजनगाव बारी**

शहरातील सिमेंट रस्त्यालगत सुरू असलेल्या नालीचे बांधकाम गेल्या अनेक दिवसांपासून रखडल्याने वॉर्ड क्रमांक चारमधील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. वारंवार पाहणी, बैठका आणि आश्वासनांनंतरही कामाला गती मिळत नसल्याने नागरिक संतप्त झाले आहेत. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, सिमेंट रस्त्याच्या डाव्या बाजूची नाली पूर्ण करण्यात आली असताना उजव्या बाजूचे काम मात्र प्रलंबित ठेवण्यात आले आहे. पावसाळा जवळ आला असून नालीचे काम अपूर्ण राहिल्यास



घरांमध्ये पाणी शिरण्याचा धोका निर्माण होण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे. काही नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित करीत निधीच्या वापराबाबत शंका व्यक्त केली आहे. प्रशासनाची ढिलाई आणि लोकप्रतिनिधींची निष्क्रियता, यामुळे परिस्थिती अधिक गंभीर होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. वॉर्ड क्रमांक चारमधील नागरिकांनी प्रशासनाला इशारा देत पावसाळ्यापूर्वी नालीचे काम युद्धपातळीवर पूर्ण करण्याची मागणी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. सिमेंट रस्त्याच्या सौंदर्यीकरणाची कामेही अपूर्ण असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे.

विशेष म्हणजे याच परिसरातील तालुका क्रीडासंकुलासमोरील नालीचे काम पूर्ण झाले असून तेथील दुकाने भाड्याने देण्याचा व्यवसाय सुरू असल्याने नागरिकांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. सिमेंट रस्त्याच्या उजव्या बाजूचे कामच का रखडवण्यात आले?, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित करण्यात येत आहे. याप्रकरणात मोठ्या गैरव्यवहाराची शक्यता असल्याचा आरोप करीत तालुका क्रीडा अधिकारी आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांच्या भूमिकेवरही नागरिकांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

दुभाजकावर रंगकाम नसणे, गतिरोधकांचा अभाव तसेच रस्त्यावरील दिव्यांमध्ये वारंवार होणारे तांत्रिक बिघाड यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. यासंदर्भात बंशीधर खडसे, बबलू तिवारी, भोजराज दारोकार, शंकरराव नवखरे, पुरुषोत्तम हजारे, तुषार माहेकर, शंकरराव हजारे, बारकाजी यमगर आणि सुनील पोकळे यांनी प्रशासनाकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली आहे.

# प्रधानमंत्री आवास योजना - महापालिकेचा अपूर्ण बांधकाम ठेवणाऱ्यांना इशारा

## ...तर लाभार्थ्यांची नावे योजनेतून वगळणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती–**

प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत बेनिफिशियरी लेड कन्स्ट्रक्शन घटकात मंजूर करण्यात आलेल्या घरकुलांचे बांधकाम निश्चित कालावधीत पूर्ण करणे बंधनकारक आहे. असे असतानाही अनेक लाभार्थ्यांनी अद्यापही घरकुलांचे काम अपूर्ण ठेवले आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेने संबंधित लाभार्थ्यांना अंतिम इशारा देत मुदतीत बांधकाम पूर्ण न केल्यास त्यांची नावे योजनेतून वगळण्याचा इशारा दिला आहे. प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत शहरातील अनेक नागरिकांना घरकुलांसाठी शासनामार्फत आर्थिक अनुदान मंजूर करण्यात आले होते. या योजनेचा उद्देश आर्थिकदृष्ट्या



दुर्बल आणि गरजू नागरिकांना स्वतःचे पक्के घर उपलब्ध करून देणे हा आहे. मात्र, काही लाभार्थ्यांनी मंजूर निधी मिळाल्यानंतरही बांधकाम निर्धारित वेळेत पूर्ण केले नसल्याचे आढळून आले आहे. प्रशासनाकडून संबंधित लाभार्थ्यांना वेळोवेळी सूचना देण्यात आल्या होत्या. तसेच बांधकाम लवकर पूर्ण करण्यासाठी वारंवार पाठपुरावा करण्यात आला होता. तरीदेखील अनेक प्रकरणांमध्ये घरकुलांचे बांधकाम अपूर्ण असल्यामुळे आता

> अपूर्ण घरकुलांच्या लाभार्थ्यांची संपूर्ण यादी महानगरपालिकेच्या https://mis.pmayamravati.com/payšreturn या अधिकृत वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे. संबंधितांनी आपले नाव तपासून घ्यावे. शासनाकडून मंजूर झालेले अनुदान परत गेल्यास किंवा लाभ रद्द झाल्यास त्यासाठी महापालिका जबाबदार राहणार नाही. त्यामुळे लाभार्थ्यांनी या सूचनेकडे गांभीर्याने पाहून तातडीने बांधकाम पूर्ण करावे. – **रविंद्र पवार,** शहर अभियंता, मनपा, अमरावती.

महापालिकेने कठोर भूमिका घेतली आहे. ज्या लाभार्थ्यांनी अद्याप बांधकाम पूर्ण केले नाही, अशांची यादी अधिकृत वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे. या यादीतील लाभार्थ्यांनी तात्काळ काम सुरू करून दिलेल्या मुदतीत बांधकाम पूर्ण करणे आवश्यक राहणार आहे. सदर सूचना प्रसिद्ध झाल्यानंतर पाच दिवसांच्या आत प्रत्यक्ष बांधकाम सुरू करणे आवश्यक आहे. तसेच पुढील एक महिन्याच्या कालावधीत घरकुलाचे काम पूर्ण न झाल्यास शासन नियमांनुसार संबंधित लाभार्थ्यांची नावे प्रधानमंत्री आवास योजनेच्या यादीतून कमी किंवा कायमस्वरूपी वगळण्यात येतील असा इशारा दिला आहे.

# धारणी तालुक्यात अनधिकृत बांधकामांना नियमानुकूल करण्याची संधी

### ३१ डिसेंबरपर्यंत अर्ज करण्याचे तहसीलदारांचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९धारणी** तालुक्यात एक जानेवारी २०११ किंवा त्यापूर्वी झालेल्या निवासी अनधिकृत बांधकामांना नियमानुकूल करण्यासाठी शासनाने विशेष योजना जाहीर केली असून पात्र नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार, धारणी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे. एक जानेवारी २०११ किंवा त्यापूर्वी अस्तित्वात असलेल्या आणि सध्या वास्तव्यास असलेल्या निवासी बांधकामांना या योजनेंतर्गत नियमबद्ध करता येणार आहे. या योजनेसाठी अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख ३१ डिसेंबर २०२६ निश्चित करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ राज्यात केवळ एकदाच मिळणार असून



नागरिकांनी वेळेत अर्ज करणे आवश्यक आहे. ५०० चौरस फूट ते १५०० चौरस फुटापर्यंतच्या बांधकामांना नियमानुकूल करण्याची तरतूद आहे. १५०० चौरस फुटांपेक्षा अधिक क्षेत्रफळ असलेल्या निवासी अतिक्रमणांना या योजनेचा लाभ मिळणार नाही. गायरान तसेच वनजमिनीवरील अतिक्रमणे नियमानुकूल करता येणार नाहीत. ग्रामपंचायत क्षेत्रातील पात्र लाभार्थ्यांनी ग्रामसेवकांमार्फत अर्ज सादर करावेत. भूमी अभिलेख कार्यालयाकडून अतिक्रमणाचे मोजमाप करून नोंद करण्यात येणार आहे. नियमानुकूल झालेल्या जमिनीचा दर्जा 'वर्ग-दोन' म्हणून नोंदविला जाईल. सदर जमीन पुढील पाच वर्षे विक्री करता येणार नाही. नोंदणीकरिता आधार कार्ड, अद्ययावत वीजबिल, मालमत्ता कर पावती, ग्रामपंचायत सातबारा किंवा आठ-अ उतारा (लागू असल्यास), झोपडपट्टी घोषणेची अधिसूचना (लागू असल्यास), तहसील कार्यालयाने पात्र लाभार्थ्यांना आवश्यक कागदपत्रांसह वेळेत अर्ज सादर करून शासनाच्या या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. ही योजना अनधिकृत बांधकामांना कायदेशीर मान्यता देण्यासोबतच नागरिकांच्या मालमत्तेवरील हक्क सुरक्षित करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

# आता २०२७ मध्येच लग्न करावे लागणार!

## विवाह मुहूर्तांसाठी आठ महिन्यांची प्रतीक्षा

## अधिक मास, शुक्र अस्त आणि सिंहस्थाचा परिणाम

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९अमरावती**

विवाहसोहळ्यांचा हंगाम सध्या जोरात सुरू असतानाच आता लग्न इच्छुकांसमोर मोठे संकट उभे ठाकले आहे. हिंदू धर्मशास्त्रानुसार १७ मे २०२६ पासून अधिक मास सुरू होत असून त्यानंतर गुरू-शुक्र अस्त, चातुर्मास आणि सिंहस्थ कुंभमेळ्यामुळे विवाहासाठी शुभमुहूर्तांचा मोठा तुटवडा निर्माण होणार आहे. परिणामी, आता १७ मेपूर्वीच लग्न उरकण्याची लगबग सुरू झाली असून, अन्यथा थेट जानेवारी २०२७ पर्यंत प्रतीक्षा करावी लागणार आहे.सध्या उपलब्ध असलेल्या मोजक्या शुभमुहूर्तांमुळे मंगल कार्यालये, बँड पथके, केटरर्स, फोटोग्राफर्स आणि सजावट व्यावसायिकांकडे बुकिंगचा अक्षरशः महापूर आला आहे. अनेक ठिकाणी मंगल कार्यालये 'हाऊसफुल्ल' झाली असून, इच्छित तारखा मिळत नसल्याने अनेक कुटुंबांनी गावपातळीवर किंवा घरगुती पद्धतीने विवाह करण्याचा पर्याय निवडण्यास सुरुवात केली आहे.धर्मशास्त्रानुसार १७ मे ते १५ जून या कालावधीत अधिक मास राहणार आहे. या काळात कोणतेही शुभकार्य, विशेषतः विवाहसोहळे, पारंपरिक पद्धतीने टाळले जातात. त्यानंतर जुलै महिन्यापासून गुरू आणि शुक्र ग्रहांचा अस्त होणार असून, त्याच काळात चातुर्मासालाही प्रारंभ होईल. चातुर्मासातही



विवाहासारखी मंगलकार्ये वर्ज्य मानली जातात. पुढे ऑक्टोबरमध्ये सिंहस्थ कुंभमेळ्याचे आयोजन असल्याने त्याचाही विवाह मुहूर्तांवर परिणाम होणार आहे. त्यामुळे आता पुढील शुभमुहूर्त थेट जानेवारी २०२७ मध्येच उपलब्ध होणार असल्याचे ज्योतिष अभ्यासकांचे म्हणणे आहे.यामुळे ज्यांच्या घरात लग्नाची बोलणी सुरू आहेत किंवा विवाह निश्चितीच्या प्रक्रियेत आहेत, त्यांनी अक्षरशः धावपळ सुरू केली आहे. सध्या अवघे काहीच दिवस शुभमुहूर्तासाठी उपलब्ध असल्याने सर्व तयारी

### आठ महिन्यांतील प्रमुख अडथळे

१७ मे ते १५ जून : अधिक मासामुळे शुभकार्ये बंदजुलैपासून : गुरू-शुक्र अस्त आणि चातुर्मास प्रारंभऑक्टोबर : सिंहस्थ कुंभमेळ्याचा प्रभावपुढील विवाह मुहूर्त : थेट जानेवारी २०२७ मध्ये

### एकाच दिवशी अनेक लग्न, नातेवाइकांचा फज्जा

मुहूर्ताच्या या टंचाईमुळे सध्या मंगल कार्यालये, बँड पथक, केटरिंग आणि फोटोग्राफर्सकडे बुकिंगचा महापूर आला आहे. एकाच दिवशी अनेक लग्नसोहळे असल्याने सेवा पुरवठादारांवर मोठा ताण् येत आहे. ग्रामीण भागात तर आचारी आणि इतर व्यवस्था मिळणे कठीण झाले असून, ऐनवेळी मागणी वाढल्याने दर वाढले आहेत. एकाच दिवशी अनेक लग्न असल्याने नातेवाइकांपुढेही पेच निर्माण होणार आहे.-

युद्धपातळीवर सुरू असल्याचे चित्र आहे. वाढत्या उन्हामुळे दिवसा लग्नसोहळे घेण्याऐवजी सायंकाळच्या मुहूर्तांना अधिक पसंती दिली जात आहे.मुहूर्तांची कमतरता आणि एका दिवशी अनेक विवाहसोहळे होत असल्याने नातेवाइकांनाही मोठा पेच निर्माण झाला आहे. एका दिवसात दोन ते तीन लग्नांना उपस्थित राहण्याची वेळ अनेकांवर येत आहे. त्यामुळे प्रवास, वेळेचे नियोजन आणि आर्थिक खर्च यांचा ताणही वाढला आहे. विशेषतः ग्रामीण भागात परिस्थिती अधिक गंभीर झाली असून, आचारी, वेटर, डेकोरेशन साहित्य आणि वाहन व्यवस्था मिळवणे कठीण बनले आहे.वाढत्या मागणीमुळे विवाहसोहळ्यांच्या खर्चातही मोठी वाढ झाली आहे. केटरिंग, सजावट, बँड पथक आणि फोटोग्राफीचे दर वाढल्याचे दिसून येत आहे. काही सेवा पुरवठादारांनी तर आधीच संपूर्ण महिन्यांची बुकिंग पूर्ण झाल्याचे सांगितले आहे. त्यामुळे अनेक कुटुंबांना नियोजन बदलावे लागत असून, कमी खर्चात साधेपणाने विवाह करण्याचा विचारही पुढे येत आहे.दरम्यान, शहरातील मंगल कार्यालयांमध्ये इच्छित तारखा मिळत नसल्याने अनेकांनी ग्रामीण भागातील सभागृहे, मंदिर परिसर किंवा मोकळ्या जागांमध्ये लग्न करण्याचे नियोजन सुरू केले आहे. काही ठिकाणी एकाच दिवशी दोन ते तीन विवाहसोहळे पार पडत असल्याचे चित्र दिसत आहे.एकूणच, धार्मिक परंपरा आणि ग्रहस्थितीमुळे यंदा विवाहमुहूर्तांची मोठी टंचाई निर्माण झाली असून, लग्न इच्छुक आणि त्यांच्या कुटुंबीयांची मोठी तारांबळ उडाली आहे. आता नाही तर थेट २०२७ मध्येच लग्न अशी परिस्थिती निर्माण झाल्याने सध्या विवाहसोहळ्यांसाठी अक्षरशः धावपळ सुरू असल्याचे चित्र सर्वत्र पाहायला मिळत आहे.

# वलगावच्या नितेश गॅस एजन्सीचा भोंगळ कारभार

## ५८ गावांतील ग्राहकांची तासन्तास फरफट

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९अमरावती :**

वलगाव येथील नितेश गॅस एजन्सीच्या कारभाराविरोधात ग्रामीण भागातील नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. एजन्सी वलगावच्या नावावर असतानाही ग्राहकांना सिलेंडर भरण्यासाठी महानगरपालिका हद्दीत यावे लागत असल्याने ग्रामीण नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. वलगावसह परिसरातील तब्बल ५८ गावांची गॅस वितरणाची जबाबदारी या एजन्सीकडे असून, दुसऱ्या कोणत्याही कंपनीला येथे काम करू दिले जात नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.दररोज शेकडो ग्राहक सकाळपासून सिलेंडरसाठी रांगेत उभे राहत असून, जवळपास ५०० ग्राहकांची गर्दी होत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. महिलांसह वृद्ध नागरिकांना कडक उन्हात उपाशीपोटी तासन्तास प्रतीक्षा करावी लागत असल्याने संताप वाढत आहे. एजन्सी परिसरात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नसून सावलीसाठी शेड किंवा बसण्याची सुविधाही



उपलब्ध नाही. त्यामुळे ग्राहकांचे प्रचंड हाल होत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.ग्रामीण भागातील ग्राहकांना वेळेवर सिलेंडर मिळत नसल्याने अनेक कुटुंबांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. एजन्सीच्या मनमानी कारभारामुळे नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले असून, प्रशासनाने तातडीने या प्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. तसेच ग्रामीण ग्राहकांसाठी स्वतंत्र वितरण व्यवस्था आणि मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशीही मागणी करण्यात येत आहे.

# स्पर्श प्रणालीचा फटका; वेळेवर पगार न झाल्याने कर्मचाऱ्यांमध्ये संताप

**विदर्भ प्रजसत्ताक**

**दि.९अमरावती** केंद्र सरकारच्या धर्तीवर राबविण्यात आलेल्या स्पर्श या नवीन ऑनलाइन वेतन प्रणालीतील तांत्रिक अडथळ्यांनी राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांच्या सेवेवर परिणाम होत असून डोकेदुखी सुद्धा वाढली आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे पगार वेळेवर होत नसल्याने सीबील तर खराब होतच आहे, शिवाय कर्जाची रक्कम वेळेवर भरत नसल्याने दर महिन्याला दंड सुद्धा भरावा लागत असल्याने कर्मचाऱ्यांना नाहक आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. करिता स्पर्श प्रणालीमध्ये असलेली तंत्रिक अडचण दूर करून वेळेवर पगार करण्याची मागणी कर्मचाऱ्यांकडून करण्यात येत आहे.

स्पर्श ही केंद्र सरकारच्या धर्तीवर राबविण्यात आलेली ऑनलाइन वेतन प्रणाली आहे. पारदर्शकता आणि वेळेवर वेतन देण्याच्या उद्देशाने ही प्रणाली सुरू करण्यात आली आहे. मात्र ज्या उद्देशाने ही प्रणाली सुरू करण्यात आली त्या उद्देशाला कुठंतरी हरताळ फासला जात असल्याचे दिसून येत आहे. या प्रणालीमुळे मेळघाटातील आरोग्य सेवेवर परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. मेळघाटातील कुपोषण, मातामृत्यू आणि बालमृत्यू कमी करण्यासाठी विविध प्रकारच्या योजना राबविण्यात येते त्यातील बहुतेक योजना या राष्ट्रीय ग्रामीण




आरोग्य योजने अंतर्गत राबविण्यात येतात, त्यामुळे या योजनेवर खर्च करण्यासाठी निधीच वेळेवर मिळत नसल्याने आरोग्य कर्मचाऱ्यांना योजना राबवितांना अडचण निर्माण होत आहे. शासनाच्या नियमांनुसार सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन दर महिन्याच्या १ तारखेला देणे बंधनकारक असून जास्तीत जास्त ५ तारखेपर्यंत वेतन देणे बंधनकारक आहे. असे असतांनाही कर्मचाऱ्यांना दोन दोन महिने प्रतीक्षा करावी लागत आहे. त्यामुळे आता स्पर्श प्रणाली पारदर्शकता आणि वेळेवर वेतन देण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आली असली तरी ही प्रणाली आरोग्य विभागासाठी आणि कर्मचाऱ्यांसाठी डोकेदुखी आणि त्रासदायक ठरू लागली आहे. परिणामी घेतलेल्या कर्जाची रक्कम वेळेवर भरत नसल्याने दर महिन्याला दंड सुद्धा भरावा लागत असल्याने कर्मचाऱ्यांना नाहक आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. त्यामुळे स्पर्श प्रणालीमध्ये असलेली तंत्रिक अडचण दूर करून वेळेवर पगार करण्याची मागणी कर्मचाऱ्यांकडून करण्यात येत आहे.

# कचऱ्याच्या ढिगावर आंदोलन करूनही प्रशासन ढिम्म

## आता दिला कानात 'औषधी' उपचाराचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९अमरावती १५**

शहरातील प्रभागात गेल्या महिनाभरापासून कचऱ्याचे ढिग साचून असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या गंभीर समस्येकडे महानगरपालिका प्रशासन आणि संबंधित कंत्राटदार सातत्याने दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस चे नगरसेवक चंदू खेडकर यांनी केला आहे.

दहा दिवसांपूर्वी त्यांनी कचऱ्याच्या ढिगावर बसून आंदोलन केले होते. मात्र



त्यानंतरही परिस्थितीत कोणताही बदल झालेला नाही.खेडकर यांनी सांगितले की, वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून ठोस उत्तर मिळत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. अतिरिक्त आयुक्तांशी प्रत्यक्ष तीन वेळा चर्चा करूनही कंत्राटदारावर कोणतीही कारवाई झालेली नाही. कंत्राटदार इतका मदमस्त झाला आहे की त्याच्या कानावर काहीच पडत नाही. मात्र माझ्याकडे त्याला ऐकू जाईल अशी 'औषधी' आहे आणि आता ती हळूहळू वापरणार, असा आक्रमक इशाराही नगरसेवक चंदू खेडकर यांनी दिला.दरम्यान, परिसरातील नागरिकांनी तातडीने कचरा उचलण्याची मागणी करत प्रशासनाने वेळेत उपाययोजना न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

# रुग्णालयात महिलेशी असभ्य वर्तनाचा आरोप

## नातेवाइकांना मॅसेज पाठवून पैशाची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९अमरावती**

रुग्णालयात पीडित महिलेशी असभ्य वर्तन करून नातेवाइकांना मॅसेज पाठवून संशयित युवकाने पैशाची मागणी केली. पिडीतेच्या खात्यातून पैसेही हडपल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला. शहर कोतवाली पोलिसांनी याप्रकरणात संशयित गौरव सिरसाट (वय २५) विरुद्ध विनयभंगाचा गुन्हा दाखल केला आहे. प्रकृती अस्वस्थ असल्याने पिडीता रात्री झोपली. पहाटे जाग आला असता, तिच्याशी रात्री कुणीतरी गैरवर्तन केल्याचे लक्षात आले. पिडीतेने स्वत:चा मोबाईल तपासला असता, त्यानंतर तिच्याच फोनमधुन जवळच्या काही नातेवाइकांना संशयित गौरव सिरसाट याने पैसे मागितल्याचे मॅसेज दिसून आले. शिवाय त्याच्या नावाचाही उल्लेख होता. पिडीतेच्या मोबाईलमधील सिमकार्ड सुद्धा त्याने काढल्याचे लक्षात आले. तिच्या बँकखात्यातुन २ हजार रुपये डेबिट झाल्याचा मॅसेज दिसून आला. पिडीतेने संशयित गौरव शिरसाट या वॉर्ड बॉयला फोनवर संपर्क केला असता, त्याचे दोन्ही मोबाईल स्वीचऑफ असल्याचे पिडीतेच्या लक्षात आले. रात्री झोपेत असताना, संशयित गौरवने आपला विनयभंग केला व २ हजार रुपयेही खात्यातून काढले. अशी तक्रार पीडित महिलेने शहर कोतवाली ठाण्यात केली असता, पोलिसांनी गौरव सिरसाटविरुद्ध विनयभंगाचा गुन्हा दाखल केला आहे.

# परिमंडळ वीज चोरीमुक्त करण्याचा निर्धार

## वर्षभरात ६,४२२ वीज चोरांवर कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९अमरावती,** वीज चोरीविरोधात महावितरणने अमरावती परिमंडळात व्यापक मोहीम सुरू केली असून गेल्या वर्षभरात ६ हजार ४२२ वीज चोरीची प्रकरणे उघडकीस आणण्यात आली आहेत. या कारवाईत संबंधितांकडून तब्बल २० कोटी ७५ लाख रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे. वीज चोरीमुळे वीज पुरवठ्यावर परिणाम होत असल्याने परिमंडळ वीज चोरीमुक्त करण्याचा निर्धार करण्यात आला असून यापुढे ही मोहीम आणखी तीव्र करण्याचे निर्देश मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी दिले आहेत.वीज चोरीला आळा घालण्यासाठी परिमंडळातील प्रत्येक विभागाला दरमहा किमान ३०० प्रकरणे पकडण्याचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. अमरावती व यवतमाळ जिल्ह्यातील प्रत्येकी चार अशा आठ विभागांमार्फत



दरमहा एकूण २ हजार ४०० प्रकरणांवर कारवाई करण्याचे नियोजन आहे. तसेच वीज चोरीतून दरमहा सुमारे ३ कोटी रुपयांचा महसूल वसूल करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.या मोहिमेसाठी परिमंडळात एकूण २२३ भरारी पथके कार्यरत करण्यात आली आहेत. यात २१० शाखास्तरीय पथके, ८ विभागीय पथके, सुरक्षा व अंमलबजावणी विभागाची ३ पथके तसेच स्काडा विभागाची २ पथके सहभागी आहेत. मोहिमेला अधिक गती देण्यासाठी नागपूर परिक्षेत्रातील इतर जिल्ह्यांतील भरारी पथकांची मदतही घेतली जाणार आहे.वीज चोरी हा दंडनीय गुन्हा असून अनधिकृत वीज वापरामुळे यंत्रणेवर अतिरिक्त ताण येतो व वीज पुरवठ्यात अडथळे निर्माण होतात. त्यामुळे नागरिकांनी वीज चोरी टाळून कारवाईसाठी आलेल्या पथकांना सहकार्य करावे. मोहिमेत अडथळा आणणाऱ्यांविरोधातही गुन्हे दाखल करण्यात येतील, असा इशारा मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी दिला आहे.-

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानातून अशोक नगर ग्रामपंचायत वंचित?

## ग्रामविकास अधिकारी व संगणक परिचालकांवर षडयंत्राचा आरोप; चौकशीची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९धा.रेल्वे**

धामणगाव रेल्वे पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या अशोक नगर ग्रामपंचायतीला मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानातील पुरस्कार प्रक्रियेतून जाणीवपूर्वक वंचित ठेवण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. याबाबत अशोक नगर ग्रामपंचायतच्या प्रशासक सरपंच स्नेहल मनोज कडू यांच्या नेतृत्वात जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले.यावेळी रेखा साठवणे, ओंकारराव खंडारे, मनीषा ठाकरे, रेखा बगाडे, शिवसेना जिल्हाप्रमुख मनोजभाऊ कडू, प्रा. प्रफुल कडू, सिद्धेश साठवणे, सुशील कडू आदी उपस्थित होते.निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानासाठी अशोक नगर ग्रामपंचायत पात्र असतानाही शासनाच्या पोर्टलवर चुकीची माहिती अपलोड करण्यात आली. तसेच आवश्यक फॉरमेट वेळेत सादर न केल्यामुळे ग्रामपंचायतीला ऑनलाइन प्रक्रियेत केवळ १८ गुण मिळाले. प्रत्यक्षात ऑफलाइन मूल्यमापनात ग्रामपंचायतीला ६९ गुण प्राप्त झाल्याचा दावा करण्यात आला आहे.ग्रामपंचायत प्रशासन, सदस्य आणि गावकऱ्यांच्या



लोकसहभागातून १६ सप्टेंबर २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत विविध विकासात्मक व सामाजिक उपक्रम राबविण्यात आले होते. मात्र, ग्रामविकास अधिकारी आणि संगणक परिचालक यांनी जाणीवपूर्वक चुकीची माहिती भरून ग्रामपंचायतीला पुरस्कार प्रक्रियेतून बाहेर ठेवण्याचा कट रचल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे.अशोक नगर ग्रामपंचायतीला यापूर्वी संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान, आर. आर. (आबा) पाटील सुंदर गाव पुरस्कार, तंटामुक्त गाव पुरस्कार, पर्यावरण ग्रामसमृद्धी पुरस्कार तसेच लोकमत सरपंच पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. त्यामुळे गावाची प्रतिमा मलीन करण्यासाठी शासन पोर्टलवर खोटी माहिती सादर करण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला.

या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे तसेच आमदार प्रताप अडसड यांनाही पाठविण्यात आल्या आहेत.

# रस्त्यावर राहाल बेशिस्त, तुमचे लायसन्स होणार रद्द..

## केंद्रीय परिवहन विभागाचा आदेश धडकले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती** रस्त्यावरील बेशिस्त वाहतुकीला लगाम घालण्यासाठी आणि अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी केंद्र सरकारने मोटार वाहन कायद्यात कठोर बदल केले आहेत. या नवीन तरतुदीनुसार, एका वर्षात पाच वेळा वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्यास संबंधित वाहनाची नोंदणी आणि चालकाचा परवाना (परवाना) कायमस्वरूपी रद्द करण्याची तरतूद केली आहे. या नियमाची अंमलबजावणी सुरू झाल्या असून, वारंवार नियम मोडणारे आता रडारवर आले आहेत. त्यामुळे आता वाहनधारकांना शिस्तीत राहूनच आपले वाहन चालवावे लागणार आहे.

**केंद्रीय मोटार वाहन कायद्यात दुरुस्ती**

केंद्र सरकारने रस्ते सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत केंद्रीय मोटार वाहन कायदा १९८८ मध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या आहेत. नवीन नियमांनुसार, केवळ दंड भरून सुटका होणार नाही, तर वारंवार नियम मोडणाऱ्यांना वाहन चालवण्यापासून कायमचे वंचित ठेवण्याचा कायदेशीर अधिकार आता आरटीओ आणि वाहतूक पोलिसांना मिळाली आहे.तसे आदेश ही प्रादेशिक परिवहन कार्यालय व वाहतूक पोलिसांना मिळाले आहेत.

### कोणकोणत्या नियमांचा समावेश?

वेग मर्यादेचे उल्लंघन, सिग्नल जंप करणे, मद्यपान करून वाहन चालवणे, वाहन चालवताना मोबाइलचा वापर, मालवाहू वाहनातून प्रवाशांची वाहतूक करणे. आदी नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.-